**अतित्वर्य/महत्वाचे** पुणे महानगरपालिका

**आजचे आज वाटणे** *** स्थायी समिती ***

## कार्यपत्रिका क्रमांक २१

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **सोमवार दि. १९/८/२०१९** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

### उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा

**विषय क्र. ७०५**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. १ चे अखत्यारीत येणाऱ्या ढोले पाटील रोड/येरवडा–कळस/नगर रोड (वडगांवशेरी) क्षेत्रिय कार्यालयाकडील माहे जुलै २०१९ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. १ यांचे जा.क्र. उप–१/१७४५ दि.७/८/२०१९ चे पत्र.

### मा.सभासदांचे प्रस्ताव

**विषय क्र. ७०६**

मा.सिध्दार्थ शिरोळे यांचे दि. ७/८/२०१९ चे पत्र.

प्रभाग क्र. १४ अ मध्ये विविध ठिकाणी यांत्रिकी पद्धतीने गाळ काढणेसाठी र.रू.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९–२० चे अंदाजपत्रक, पान नं.२१०, अनु क्र.१५६, सीई२०सी३५२/बी५–२१५६, प्रभाग क्र.१४ ड मध्ये विद्युत विषयक कामे करणे | १० लाख | --- |
| नवीन सुचविलेले काम – | | |
| प्रभाग क्र. १४ अ मध्ये विविध ठिकाणी यांत्रिकी पद्धतीने गाळ काढणे | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. ७०७**

मा.ॲड्.भैय्यासाहेब जाधव यांचे दि. ८/८/२०१९ चे पत्र.

पुणे शहरात व खडकवासला प्रकल्पाच्या ठिकाणी पाऊस चांगल्या प्रमाणात होत असून हवामान खात्याकडून अतिवृष्टीचा इशारा देखील देण्यात आलेला आहे. सबब नदीमधून मोठया प्रमाणात पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे. नदीकिनारी अनेक वर्षांपासून वसाहती असून या वसाहतींमध्ये तसेच मनपा परवानगी प्राप्त सोसायटयांमध्ये देखील पाणी घुसल्याच्या अनेक घटना घडलेल्या आहेत. वसाहतीमध्ये पाणी शिरून गोरगरीब नागरिकांचे संसार रस्त्यावर आले आहेत. सबब शेकडो नागरिकांना मनपाच्या शाळेत, विविध सभागृह, गणेश मंडळाचे हॉल अशा ठिकाणी स्थलांतरित करण्यात आले आहे.

सदर प्रकरणी मा.आयुक्त यांच्या देखरेखीखाली आपत्ती व्यवस्थापन कक्ष व पुणे महानगरपालिकेचे प्रशासन कार्यरत आहेत. एकूण परिस्थिती पाहता गोरगरीब नागरिकांचे यामुळे आर्थिक नुकसान झालेले आहे. प्रशासनाकडून सदर प्रकरणी पंचनामे करण्यात येतात, परंतू कोणतीही आर्थिक मदत केली जात नाही. सबब अशा नुकसान झालेल्या नागरिकांना प्रति कुटुंब कमीत कमी र.रू.२०,०००/– इतकी आर्थिक मदत पुणे महानगरपालिकेकडून करण्यात यावी.

**विषय क्र. ७०८**

मा.श्रीमती लताताई राजगुरु यांचे दि. ९/८/२०१९ चे पत्र.

प्रभाग क्र.२० क मध्ये विविध ठिकाणी व्यायामशाळा साहित्य पुरविणेसाठी र.रू.३० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात यावी.

| अर्थशीर्षकाचे नाव | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९–२० चे अंदाजपत्रक,<br>१) बजेट कोड क्र. आरई१९अे१५३/एसआर११–२३२, प्रभाग क्र.२० क मध्ये मनपा शाळा व शौचालयांमध्ये महिलांच्या आरोग्य संबंधी सॅनिटरी नॅपकीन पुरविणे. | १० लाख | – |

| | | |
|---|---|---|
| २) बजेट कोड क्र. आरई१२अे१४४ पान क्र.४८, प्रभाग क्र.२० क मध्ये शालेय विद्यार्थ्यांना बॅगा पुरविणे. | १० लाख | - |
| ३) बजेट कोड क्र. आरई११एन१२२/एसआर९-४३, प्रभाग क्र.२० क मध्ये युपीडी योजनेंतर्गत गरीब विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षणासाठी विविध शाळांना व प्रशिक्षण केंद्राना व महिला बचत गटांना संगणक पुरविणे. | १० लाख | - |
| नविन सुचविलेले काम- | | |
| प्रभाग क्र.२० क मध्ये विविध ठिकाणी व्यायामशाळा साहित्य पुरविणे | - | ३० लाख |

**विषय क्र. ७०९**

मा.ॲड्.सौ.गायत्री खडके यांचे दि. १३/८/२०१९ चे पत्र.

प्रभाग क्र.१५ ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात यावी.

| अ.क्र. | अर्थशीर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|---|
| १. | सन २०१९-२० चे अंदाजपत्रक,<br>बजेट कोड एफई१४ए१०५/एसजी२-७८३, प्रभाग क्र.१५ ब, भिडे पूलाजवळ शौचालय उभारणे. | १० लाख | - |
| २. | बजेट कोड आरई२२ए११३/एसआर१४-१२, प्रभाग क्र.१५ ब मध्ये विविध गणेश विसर्जन घाटांवर / हौदांवर विविध सुधारणा विषयक कामे करणे | १० लाख | - |
| ३. | बजेट कोड आरई२२ए११३/एसआर१४-११, प्रभाग क्र. १५ ब मधील विविध आरोग्य कोठ्यांमध्ये व दवाखान्यांमध्ये दुरूस्ती विषयक कामे करणे. | १० लाख | - |
| ४. | बजेट कोड सीई२६ए३३६/एसयु१-११२५, प्रभाग क्र. १५ ब मध्ये ओपन जिम विकसित करणे. | १० लाख | - |
| ५. | बजेट कोड सीई२६ए३३६/एसयु१-११२६, प्रभाग क्र. १५ ब येथे विविध उद्यानात खेळणी बसविणे. | १० लाख | - |
| | नविन सुचविलेली कामे- | | |
| १. | प्रभाग क्र. १५ ब मध्ये शनिवार पेठ व प्रभागात जेटींग मशिनच्या सहाय्याने साफ-सफाई करणे. | - | १० लाख |
| २. | प्रभाग क्र. १५ ब मध्ये सदाशिव पेठ व प्रभागात विविध ठिकाणी पावसाळी लाईन टाकणे व तद्नुषंगिक कामे करणे. | - | १० लाख |
| ३. | प्रभाग क्र. १५ ब मध्ये सदाशिव पेठ व प्रभागात विविध ठिकाणी कॉंक्रिटीकरण करणे व तद्नुषंगिक कामे करणे. | - | १० लाख |
| ४. | प्रभाग क्र. १५ ब मध्ये शनिवार पेठ व प्रभागात विविध ठिकाणी कॉंक्रिटीकरण करणे व तद्नुषंगिक कामे करणे. | - | १० लाख |
| ५. | प्रभाग क्र. १५ ब मध्ये नारायण पेठ व प्रभागात विविध ठिकाणी कॉंक्रिटीकरण करणे व तद्नुषंगिक कामे करणे. | - | १० लाख |

**विषय क्र. ७१०**

मा.मारुती तुपे यांचे दि. १३/८/२०१९ चे पत्र.

प्रभाग क्र. २३ ड मध्ये विविध ठिकाणी सी.सी.टी.व्ही.कॅमेरे बसविणेसाठी र.रू.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, बजेट कोड नं. CE26A336/SU1-1166, प्रभाग क्र.२३ ड मध्ये मनपा शाळा क्र.३२ समोरील जागेत आकर्षक झाडे लावणे | १० लाख | --- |
| <u>नवीन सुचविलेले काम -</u> | | |
| प्रभाग क्र. २३ ड मध्ये विविध ठिकाणी सी.सी.टी.व्ही.कॅमेरे बसविणे | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. ७११**

मा.राजेंद्र शिळीमकर व मा.विशाल धनवडे यांचे दि. १३/८/२०१९ चे पत्र.

प्रभाग क्र. ३६ ड मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी करणेसाठी र.रु. ४० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे अंदाजपत्रक,<br>१) बजेट कोड नं. सीई२०अे१२४९/एसए६-६३१, प्रभाग क्रमांक ३६ ड मध्ये जयवर्धन सोसायटीमध्ये रस्ता विकसित करणे<br>२) बजेट कोड नं. सीई२०अे१२४९/एसए६-६३२, प्रभाग क्रमांक ३६ ड मध्ये जयवर्धन सोसायटीमध्ये मुख्य रस्ता विकसित करणे | २० लाख<br>२० लाख | ---<br>--- |
| नवीन सुचविलेली कामे<br>१) प्रभाग क्र.३६ ड मध्ये हमालनगर परिसरात कॉंक्रीटीकरण करणे<br>२) प्रभाग क्र.३६ ड मधील कोठारी ब्लॉक परिसरात कॉंक्रीटीकरण करणे | ---<br>--- | २० लाख<br>२० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. ७१२**

मा.राजेंद्र शिळीमकर व मा.दिपक पोटे यांचे दि. १३/८/२०१९ चे पत्र.

प्रभाग क्र. ३६ ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी करणेसाठी र.रु. २५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, बजेट हेड – CE26A336/SUI-1194– प्रभाग क्र.२८ब मध्ये एकता उद्यान विकसित करणे | २५लाख | --- |
| नवीन सुचविलेली कामे<br>१) प्रभाग क्र.३६ब मधील आण्णाभाऊ साठे सभागृह परिसरामध्ये तदनुषंगिक कामे करणे<br>२) प्रभाग क्र.३६ब मध्ये बिबवेवाडी शाळेमध्ये रंगरंगोटी करणे<br>3) प्रभाग क्र.३६ब मध्ये पापळ वस्ती, इंदिरा नगर, प्रसाद बिबवे नगर येथे ड्रेनेज लाईन टाकणे | ---<br>---<br>--- | १० लाख<br>५ लाख<br>१० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. ७१३**

मा.सौ.वैशाली मराठे यांचे दि. १३/८/२०१९ चे पत्र.

प्रभाग क्र.११ क मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु. ५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे अंदाजपत्रक,<br>१)बजेट कोड नं.झेडई१६बी१०२/एसडी२-३२३८, प्रभाग क्र ११ क किष्किंदानगर येथील श्री गणेश मित्र मंडळ जवळील गल्लीबोळात ड्रेनेज लाईन टाकणे व कॉंक्रीटीकरण करणे<br>२)बजेट कोड नं. झेडई१६बी१०२/एसडी२-३२३६, प्रभाग क्र ११ क किष्किंदानगर येथे राजा शिवराय मित्र मंडळ मागील चाळीत ड्रेनेज लाईन टाकणे व कॉंक्रीटीकरण करणे<br>३)बजेट कोड नं.सीई२२अे७०४/एसजे२०-४४२, प्रभाग क्र ११ क मध्ये समाजमंदिर रंगरंगोटी करणे<br>४)बजेट कोड नं.एफई१४अे१०५/एसजी२-७६२, प्रभाग क्र ११ क मोरे श्रमिक वसाहत येथील शौचालय विषयी दुरुस्ती विषयक कामे करणे<br>५)बजेट कोड नं.एफई१४अे१०५/एसजी२-७६४, प्रभाग क्र ११ क राजीव गांधी पार्क येथील शौचालय विषयी दुरुस्ती विषयक कामे करणे | १० लाख<br>१० लाख<br>१० लाख<br>१० लाख<br>१० लाख | ---<br>---<br>---<br>---<br>--- |

| | | |
|---|---|---|
| नवीन सुचविलेली कामे | | |
| १)प्रभाग क्र.११ क मधील जयभवानीनगर येथील गल्लीबोळात ड्रेनेज लाईन साफसफाईची कामे करणे | --- | १० लाख |
| १)प्रभाग क्र.११ क मधील किष्कींदानगर येथील गल्लीबोळात ड्रेनेज लाईन साफसफाईची कामे करणे | --- | १० लाख |
| ३) प्रभाग क्र.११ क मधील विविध ठिकाणी ओपन जिम साहित्य पुरविणे व बसविणे | --- | १० लाख |
| ४) प्रभाग क्र.११ क मधील विविध सार्वजनिक ठिकाणी रंगरंगोटी करणे | --- | १० लाख |
| ५) प्रभाग क्र.११ क मधील सुतारदरा मध्ये समाजमंदिर बांधणे | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. ७१४**

मा.अमोल बालवडकर यांचे दि. १३/८/२०१९ चे पत्र.

प्रभाग क्र.०९ क बाणेर-बालेवाडी परिसरात विविध ठिकाणी टँकरने पाणी पुरवठा करणेसाठी र.रू.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, झेड१६ ए१०४/एसपी२-२०५३, प्रभाग क्र. ९ क बालेवाडी महादेव मंदिर ते विसर्जन घाट ८ इंची पिण्याची पाईप लाईन टाकणे | १० लाख | --- |
| नवीन सुचविलेले काम - | | |
| प्रभाग क्र.०९ क बाणेर-बालेवाडी परिसरात विविध ठिकाणी टँकरने पाणी पुरवठा करणे | --- | १० लाख |

**विषय क्र. ७१५**

मा.अमोल बालवडकर यांचे दि. १३/८/२०१९ चे पत्र.

प्रभाग क्र.०९ क बाणेर-बालेवाडी परिसरात विविध ठिकाणी टँकरने पाणी पुरवठा करणेसाठी र.रू.१०.५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, झेड१६ ए१०४/एसई-६७० प्रभाग क्र.०९ क बालेवाडी फाटा ते लक्ष्मीमाता मंदिरापर्यंत मुख्य जलवाहिनी विकसित करणे | १०.५० लाख | --- |
| नवीन सुचविलेले काम - | | |
| प्रभाग क्र.०९ क बाणेर-बालेवाडी परिसरात विविध ठिकाणी टँकरने पाणी पुरवठा करणे | --- | १०.५० लाख |

**विषय क्र. ७१६**

मा.सौ.कविता वैरागे यांचे दि. १३/८/२०१९ चे पत्र.

प्रभाग क्र.२८ अ मधील लुल्लानगर परिसरातील विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणेसाठी र.रू.१५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, बजेट कोड सीई २७ ए२४१/एसजे२४-५६८, प्रभाग क्र.२८ अ मध्ये डायस प्लॉट मधील सुलभ शौचालय दुरूस्ती करणे व इतर तदनुषगिक कामे करण | १५ लाख | --- |
| नवीन सुचविलेले काम - | | |
| प्रभाग क्र.२८ अ मधील लुल्लानगर परिसरातील विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे | --- | १५ लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

## माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्र. ७१७**

सह महापालिका आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. ४ यांच्या अखत्यारीतील दि.१६/७/२०१९ ते दि.३१/७/२०१९ पर्यंतची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तद्नुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/परि–४/२१६ दि.८/८/२०१९ चे पत्र.

## सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स

**विषय क्र. ७१८**

प्रभाग क्र. ४१ ब मध्ये विविध ठिकाणी रस्ते विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.आदर्श कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४३,७१,७३८=८४ पेक्षा १८.१५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३५,७८,२६८=२४ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ५,२४,६०८=६६ पर्यंत अधिक रॉयल्टी र.रुपये ५३,४२६=५२ पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये ४९,६६८/– पर्यंत अदा करणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/२०२ दि. ७/८/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. ७१९**

प्रभाग क्र. ३३ मधील वडगांव बु. नवले ब्रीज ते सिंहगड रस्ता येथे सर्व्हिस रस्ता करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.दिपक कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.८५,२३,५३१/– पेक्षा ०.९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.८४,३९,१४८=०४ पर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये १०,२२,८२३=७२ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु. २,४२,३९८=१० पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये ११,१८५/– पर्यंत अदा करणेस अधिक टेंडर अटीशर्तीनुसार विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/२०३ दि. ७/८/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. ७२०**

प्रभाग क्र. १० ड बावधन कोथरुड डेपो अंतर्गत बावधन टिन्सले टाऊन सोसायटी ते वैदेही सोसायटी पर्यंतचा रस्ता व पदपथ विकसित करणे व प्रभाग क्र. १० ड बावधन कोथरुड डेपो अंतर्गत एकलव्य कॉलेज ते राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ (डुक्कर खिंड) पर्यंतचा रस्ता विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.अमित एंटरप्रायझेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ३५,१२,२६१=०८ पेक्षा १.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३४,७७,१३८=४७ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जीएसटी र.रुपये४,२१,४७१=३३ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये ४०,६३५=२५ पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये २५,३०८/– पर्यंत अदा करणेस अधिक टेंडर अटी शर्तीनुसार डांबर, स्टील, सिमेंट या विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/२०४ दि. ७/८/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. ७२१**

हडपसर मुंढवा क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत प्रभागामध्ये टँकरने पिण्याचे पाणी पुरवठा करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार रवि फुडस ॲन्ड बेव्हरेजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३९,९९,६००/– पेक्षा ०% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु.३९,९९,६००/– पर्यंत काम करून घेणेसाठी त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पापु/२०५ दि. ७/८/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. ७२२**

४५ दलली/दिन मुंढवा मैलापाणी शुध्दिकरण केंद्र चालविणे व देखभाल दुरुस्ती करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार विश्वराज एनव्हॉयरोमेंट प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (पुर्वगणनपत्रक र.रु. ७,०६,६१,६००/– पेक्षा १०.१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५,६७,१८,५५२=१४ अधिक १२% वस्तू व सेवा कर र.रुपये ६८,०६,२२६=२६ म्हणजेच एकुण निविदा र.रुपये ६,३५,२४,७७८=४० वस्तू व सेवा करा सह

अधिक पुणे मनपा तत्सम पदाचे सेवकांच्या वेतनामध्ये होणारा फरक व विविध कायदे व नियमांनुसार सेवकांचे वेतनामध्ये होणारा फरक या नुसार होणाऱ्या रकमे पर्यंत साठ महिन्यांसाठी काम करुन घेणेस व त्यांचेशी करारनामा करणेस आणि त्यांनी केलेल्या कामापोटी बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/विदयुत/२०८ दि. ८/८/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. ७२३**

प्रभाग क्र. ४ खराडी मधील स.नं. २२ येथील शाळेसाठी (पि.एस. ९८) आरक्षित असलेल्या जागेवर ई–लर्निंग शाळेचे बांधकाम करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सलिम कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.८८,०९,४७५=५० पेक्षा २१.५१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६९,१४,५५७=३१ उपलब्ध तरतुदी रकमेपर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये १०,५७,१३७=०६ पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग र.रुपये १,३१,८३६/– पर्यंत अधिक निविदा अटी शर्तीनुसार सिमेंट, स्टील या विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रांनुसार फरक अदा/कपात करणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/२१४ दि.८/८/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. ७२४**

प्रभाग क्र. ४१ अ कोंढवा बु. स.नं. १५ येथील ताब्यात आलेल्या ॲमिनिटी स्पेसवर मैदानी खेळ प्रशिक्षण केंद्र उभारणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.महादेव सोपान गोते ॲन्ड सन्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.६३,४५,४८८/– पेक्षा ०.१०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ६३,३९,१४२=५१ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ७,६१,४५८=५६ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये ६२,१८९=६० पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये ३७,४८६/– पर्यंत अधिक टेंडर अटीशर्तीनुसार पर्यंत सिमेंट, स्टील यांना विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/२१५ दि.८/८/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. ७२५**

प्रभाग क्र. ९ अ आदिशक्ती योगभवन मैदान येथे विविध खेळाच्या सुविधा विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.मदन एन्टरप्रायझेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४३,३५,४८१=५६ पेक्षा १३% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३७,७१,८६८=९५ पर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ५,२०,२५७=७९ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये ७१,२३५=३६ पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये १९,६८८/– पर्यंत अधिक टेंडर अटीशर्तीनुसार सिमेंट, स्टील यांना विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/२१७ दि.८/८/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. ७२६**

प्रभाग क्र. १९ अ मध्ये महर्षी हरकादास विद्यालय या ठिकाणी वर्गखोल्या बांधणे, रंगरंगोटी करणे व इतर दुरूस्ती विषयक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.मेघना कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.५४,४५,३७७=९२ पेक्षा ०.९१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू.५३,९५,८२४.९८ पर्यंत अधिक जी.एस.टी र.रू. ६,५३,४४५=३५ पर्यंत, टेंडर अटी शर्तीनुसार सिमेंट, स्टील यांना विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/२१९ दि.९/८/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. ७२७**

सिंहगड क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत पडिक हद्दीतील झाडण काम व स्वच्छतेचे काम आऊट सोर्सिंग पद्धतीने करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.राजवीर एन्टरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.५,२३,४६,३६१=६० पेक्षा मागील वर्षाचे टेंडर दर १२.००% जास्त असून यावर्षीचे तडजोडीने ९.९९ जास्त दरानुसार व २०.००% जास्त तडजोडीने ९.९९% जास्त तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून काम करुन घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/परि.३/२२० दि.१३/८/२०१९ चे पत्र.

अ) सिंहगड क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत पडिक हद्दीतील झाडण काम व स्वच्छतेचे काम आऊट सोर्सिंग पद्धतीने करणे हे काम अत्यावश्यक बाब म्हणून अखंडीत स्वरूपात करून घेण्यात आले असल्याने तसेच याच ठेकेदाराचे गेल्या वर्षीचे टेंडर क्र.४०-२०१८ हे १२.००% जास्त दराने असून मनपाचे आर्थिक हित जोपासणेसाठी या वर्षातील सर्वात कमी दराचे ठेकेदार मे. राजवीर एन्टरप्रायजेस यांचेकडून २०% जास्त तडजोडीने ९.९९% जास्त दराने दि.०१/०४/२०१९ ते दि.३१/०७/२०१९ पर्यंत र.रू. १,४३,९३,९४०.७८ पर्यंत काम करून घेणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करणेस पश्चात मान्यता मिळणेस

ब) सदर काम अत्यावश्यक बाब म्हणून अखंडीत स्वरूपात दि.०१/०८/२०१९ पासून काम करून घेणेस सर्वात कमी दराचे ठेकेदार मे.राजवीर एन्टरप्रायजेस यांचेकडून २०% जास्त तडजोडीने ९.९९% जास्त र.रू.४,३१,८१,८२२.३४ बजेटमध्ये उपलब्ध तरतुदीपर्यंत काम करून घेणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करणेस

**विषय क्र. ७२८**

प्रभाग क्र. १० ड बावधन कोथरूड डेपो अंतर्गत बावधन खुर्द गाव मुख्य रस्ता विकसित करणे व प्रभाग क्र.१० ड बावधन कोथरूड डेपो अंतर्गत आशिष गार्डन ते शांतीबन चौक ३६ मी डी पी रस्ता विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.शुभम कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.७०,८९,५११=७० पेक्षा ०.९९९९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.७०,१८,६१७=२९ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ८,५०,७४१=४० पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये १९,७८७=६० पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये ३९,६४५/- पर्यंत अदा करणेस अधिक टेंडर अटी शर्तीनुसार डांबर, स्टील, सिमेंट या विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/२२१ दि.१३/८/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. ७२९**

प्रभाग क्र.१७ मधील भवानी पेठ येथील वहीकर गॅस एजन्सी ते वटेश्वर भवन रस्ता करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.श्री सदगुरूकृपा डेव्हलपर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२६,२५,१२२/- पेक्षा १०.१७% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२३,५८,१४७=०९ पर्यंत काम करून घेणेस व त्याचे बरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ३,१५,०१४=६४ पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये५५,०२५/- पर्यंत अदा करणेस अधिक टेंडर अटीशर्तीनुसार विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/२२२ दि.१३/८/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. ७३०**

प्रभाग क्र. ३० अ मधील नवसा मारूती मंदिर व जनता वसाहत दत्तवाडी मधील रस्ते डांबरीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.ऋषभ कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.८८,२३,०२६/- पेक्षा ०.९९९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.८७,३४,८०४=५६ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये १०,५८,७६३=१२ पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये१४५४६/- अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये १,०३,४६०=८८ पर्यंत अदा करणेस अधिक टेंडर अटी शर्तीनुसार डांबर, स्टील, सिमेंट या विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/२२३ दि.१३/८/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. ७३१**

औंध बाणेर क्षेत्रिय कार्यालयाचे अंतर्गत रोड मेन्टेनन्स व्हॅन व्दारे रस्ते दुरूस्तीचे कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.जय शिवशंकर कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.८९,२४,५५५=०४ पेक्षा १७.१८% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.७३,९१,३१६=४८ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये १०,७०,९४६=६१ पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये४,४६३/- पर्यंत अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/२२४ दि.१३/८/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. ७३२**

पुणे शहरातील कोथरूड बावधन क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत कॉक्रीट व डांबरी रस्त्याचे रोड मेंटेनन्स व्हॅनव्दारे वार्षिक देखभाल दुरूस्ती विषयक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. सिध्दीविनायक कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ८९,२७,९३५/- पेक्षा १६.८५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.७४,२३,५७७=९५ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये१०,७१,३५२=२० पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रू.०=०० पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये ०=०० पर्यंत अदा करणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/२२५ दि.१३/८/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. ७३३**

कोथरूड क्षेत्रिय कार्यालयांतर्गत पडिक हद्दीतील सार्वजनिक स्वच्छता व झाडणकाम आऊटसोर्सिंग पद्धतीने करणे (सन २०१९-२०) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.हेमंत व्ही.शहा यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४,५१,७२,६७०=४० पेक्षा ९.९९% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु.४,९६,८५,४२०=१७ बजेटमध्ये उपलब्ध निधीचे अधीन राहून पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटी शर्तीनुसार कामगार वेतनात शासनाकडुन वेळोवेळी होणारी वेतन वाढ व विशेष भत्यातील भाववाढ अदा करणेस व सदर काम अत्यावश्यक सेवेत मोडत असल्याने या कामास निविदा उघडणेच्या दिनांकानंतर व वेळोवेळी उपलब्ध अंदाजपत्रकीय तरतुदी पर्यंत काम करून घेणेस व त्याच्यांशी करारनाम करणेस, बील अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पक्र.२/२२६ दि.१३/८/२०१९ चे पत्र.

## टेंडर्स न मागविता ५(२)(२) अन्वये प्रकरणे

**विषय क्र. ७३४**

राष्ट्रीय केमिकल्स ॲन्ड फर्टीलायझर्स लिमिटेड यांचेकडून गणेश मूर्त्या विसर्जनासाठी १०० टन अमोनियम बायकर्बोनेट महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड प्रकरण ५ मधील कलम २(२) प्रमाणे खरेदी करणेस व करारनामा करुन घेणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/घकव्यका/२१२ दि. ८/८/२०१९ चे पत्र.

१) महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड प्रकरण ५ मधील कलम २(२) नुसार राष्ट्रीय केमिकल्स ॲन्ड फर्टीलायझर्स लिमिटेड यांचेकडून १०० टन अमोनियम बायकार्बोनेट खरेदी करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस
२) राष्ट्रीय केमिकल्स ॲन्ड फर्टीलायझर्स लिमिटेड यांचेकडून १०० टन अमोनियम बायकार्बोनेट खरेदी पोटी र.रुपये१९,८२,९९०/- (जी.एस.टी. करासहित) आर.टी.जी.एस.द्वारे अदा करणेस
३) राष्ट्रीय केमिकल्स ॲन्ड फर्टीलायझर्स लिमिटेड यांचेकडून १०० टन अमोनियम बायकार्बोनेटची वाहतुक पुणे महानगरपालिकेमार्फत करणेस
४) १०० टन अमोनियम बायकार्बोनेट खरेदी करणेसाठी खालील अर्थशिर्षकावरुन रक्कम अदा करणेस
सन २०१९-२०, आरई१९अे१५९, गणपती उत्सवासाठी अमोनियम बायकार्बोनेट खरेदी करणे (मान्य तरतुद र.रुपये ३०,००,०००/-)

## संकिर्ण

**विषय क्र. ७३५**

पुणे, पेठ बालेवाडी स.नं. १७/५/५,१७/५/६ व १७/४/७ येथील प्ले-ग्राऊंड(पीजी-२) या आरक्षित जागेकरिता जागा मालक श्री.बाबु हुलवंतराव मरलापल्ले, श्री. मंजुनाथ स्वामीराव मगनहल्ली व सौ. सरोज जवाहर पटेल यांनी पुणे म.न.पा.स. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम कलम १२७ अन्वये बजावलेल्या परचेस नोटीसचे अनुषंगाने भूसंपादनाची कार्यवाही सुरू करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शअ/२०६ दि.८/८/२०१९ चे पत्र.

**विषय क्र.७३६**

डेक्कन कॉलेज पदव्युत्तर व संशोधन संस्था पुणे, या शासकीय मालकीच्या वास्तुचे जतन संवर्धनाचे काम करण्यास र.रू.७५ लक्ष पुणे महानगरपालिकेच्या महापौर निधीतून खर्च करण्यासाठी मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्यसभेची मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/२०९ दि.८/८/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. ७३७**

धायरी फाटा येथील टँकर पाईंट वरील खाजगी टँकरचे दर निश्चितीबाबत खालील बाबीस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्यसभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/पापु/२१३ दि.८/८/२०१९ चे पत्र.

१. सदर भागाची पाण्याची गरज व नागरीकांची मागणी पहाता, सदर र.रू.२००/- प्रति टँकर (रॉ वॉटर) खाजगी टँकर धारकांकडून भरून घेऊन, त्यांना धायरी येथील टँकर पाईंटवरून टँकर भरून देणेस.

सुनिल पारखी
नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)